# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/९६७ अ

दिनांक : 3 1 JUL 2018

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणा-या जागांवर प्रवेश करण्यासंदर्भात सूचना

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे केंद्रीभूत प्रवेश फे-या संपन्न होत आहेत. शासनमान्य प्रवेश नियम तसेच , पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०४ दिनांक २४.४.२०१७ मधील प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक १३ व दिनांक ५.६.२०१८ रोजीच्या शासन राजपत्र असाधारण क्रमांक २०२ अन्वये निर्गमित सुधारीत प्रवेश नियमावलीमधील मुद्दा क्रमांक ९ नुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठीची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. त्यानुसार विना अनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, यांनी प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर रिक्त जागा भरणेबाबत संस्थेने प्रवेशाबाबतचे वेळापत्रकासोबत **केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांची संख्या त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.**

राज्यातील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांवर संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्याक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागावर प्रवेशासाठी वरील तरतूदी बंधनकारक असून त्यानुसार प्रवेश करण्यात यावेत.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण ,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव अग्रेषित :
१.मा.सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०००३२
२. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३.मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर - त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या सूचनाफलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्रमांक ३,(माहिती तंत्रज्ञान शाखा ) मुख्य कार्यालय ,मुंबई -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.